# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

:: प्रधान कार्यालय ::
" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट , मुंबई ४०० ००१, दूरध्वनी – २२६१७१ ५४ ते ५९

# सुधारीत शैक्षणिक कर्ज धोरण

Z:\Vaishu\Karj Dhoran 2026\Date 01.01.2026\Individual\Covering.Doc

(४१)

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

## सुधारीत शैक्षणिक कर्ज धोरण

**दिनांक ०१/०१/२०२६ पर्यंत अद्यावत बदलासह कर्ज धोरण**

दिनांक ३०/०६/२०१५ रोजी झालेल्या ४१/५ वी, संचालक मंडळ सभेतील
ठराव क्रमांक १७ अन्वये मंजूर झालेले

### ❖ योजनेचा उद्‌देश :-

शैक्षणिक कर्ज योजनेचा उद्‌देश भारत आणि परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य प्रदान करणे आहे. गुणवंत विद्यार्थ्याला गरीब असला तरी त्याला परवडणाऱ्या अटी व शर्तीवर बँकिंग व्यवस्थेकडून आर्थिक पाठबळ देवून शिक्षण घेण्याची संधी देणे.

अ) पात्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश हा गुणवत्तेवर आधारीत निवड प्रक्रियेद्वारे होत असल्यास तो / तिला गुणवंत विद्यार्थी मानले जावू शकते.

ब) व्यासायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमांना प्रवेश हा सामायिक प्रवेश परिक्षेद्वारे होत असल्यास आणि या प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणारे गुणवंत विद्यार्थी मानले जावू शकतात.

### ❖ पात्रता : निकष :

१. अर्जदार व सहअर्जदार बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये कायम स्वरुपी वास्तव्य / नोकरी / व्यवसाय करीत असावेत.

२. भारतातील किंवा परदेशातील शिक्षणाकरीता कर्ज मागणी करणारा विद्यार्थी भारतीय नागरीक असणे आवश्यक राहिल.

३. ज्या विद्यार्थ्यांचे वय १८ वर्षे पूर्ण झालेले नसेल अशा विद्यार्थ्यांचे आई / वडील / पालक हे अर्जदार म्हणून राहतील.

४. जे विद्यार्थी विवाहीत असतील त्यांचे बाबतीत जोडीदार/ आई / वडील/ सासू/सासरे यांना सहअर्जदार म्हणून घेणे आवश्यक राहिल.

५. ज्या विद्यार्थ्याचे वय १८ वर्षे पूर्ण झालेले नसेल अशा विद्यार्थ्यांसाठी अर्जदार म्हणून आई / वडील/पालक असतील त्यांचा नोकरी मधून निवृत्त होण्याचा कालावधी किमान विद्यार्थ्याचा शैक्षणिक कोर्स कालावधी इतका शिल्लक / बाकी असणे आवश्यक आहे.

६. जर शैक्षणिक कर्जासाठी अर्जदार किंवा सहअर्जदार व्यावसायिक असतील तर वयोमर्यादा (शैक्षणिक कोर्स कालावधी + मोरॅटोरियम कालावधीसह) कमाल ६५ वर्षे इतकी राहिल.

७. अर्जदार, सहअर्जदार व जामिनदार यांना नाममात्र सभासदत्व फी भरणा करुन बँकेचे नाममात्र सभासदत्व घ्यावे लागेल.

८. अर्जदार व सहअर्जदार यांचे एकत्रित बचत खाते (जॉईंट अकौंट) व स्पेशल बचत खाते उघडावे लागेल.

९. अर्जदार व सहअर्जदार यांची स्वमालकीची सदनिका / गाळा / दुकान उपनगरीय रेल्वेची प्रवासी वाहतूक उपलब्ध असलेल्या परिसरात (उदा. पश्चिम रेल्वे डहाणू पर्यत, मध्य रेल्वे कर्जत /कसारा पर्यंत तर हार्बर रेल्वे पनवेल, खारकोपर, उलवे पर्यंत) असेल अशा अर्जदारास शैक्षणिक कर्ज सुविधा उपलब्ध केली जाईल.

१०. बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये भाडेकरार करुन वास्तव्यास असणारी व्यक्ती कर्ज मागणी करण्यास पात्र नसेल.

११. बँकेच्या रु.७.५० लाखापर्यंतच्या कर्जास दोन सक्षम जामिनदार देणे आवश्यक राहिल.

१२. बँकेच्या रु.७.५० लाखावरील कर्जाकरीता अतिरिक्त तारण घेत असल्यामुळे जामिनदार घेण्याची आवश्यकता नाही. अशा कर्जाकरीता कोलॅटरल सिक्युरिटी म्हणून घर/गाळा/दुकान तारण / इक्विटेबल मॉर्गेज तसेच एल.आय.सी./एन.एस.सी./ केव्हीपी/सोने/मुदत ठेव पावती/ आर.बी.आय.बॉण्ड/विमा पॉलिसी सरेंडर व्हॅल्यू (बँकेचे नावे असाईनक करुन) इ. आवश्यक असेल.

१३. कर्जदाराच्या स्थावर मालमत्तेचे इक्वीटेबल मॉर्गेज ऐवजी नव्याने विकसीत झालेल्या ई–फायलिंग बाबतची कार्यवाही करताना ०.२०% मुद्रांक शुल्क (Stamp Duty) ऐवजी ०.३०% मुद्रांक शुल्क (Stamp Duty) लावण्यात यावी. तसेच ई–फायलिंग नोंदणीकरीता ०.५०% व जास्तीत जास्त रक्कम रू.१५,०००/– नोंदणी शुल्क आकारण्यात यावे. याबाबतचा संपुर्ण खर्च तसेच मालमत्तेचे लिगल व मुल्यांकन खर्च अर्जदाराने करावयाचा आहे.

१४. विद्यार्थी /आई/वडील/पालक यांचेकडे कर्जास पुरक तारण मालमत्ता नसल्यास व अन्य व्यक्ती त्याची स्वतःची मालकीची मालमत्ता संबंधीत कर्जास तारण म्हणून देण्यास तयार असल्यास संबंधीत व्यक्तीस कर्जास जामिनदार म्हणून घेणे आवश्यक राहिल.

१५. अर्जदार विद्यार्थी वगळता इतर सहअर्जदार / जामिनदार यांचा सिबील रिपोर्ट तपासूनच कर्ज मंजूरी देण्यात येईल.

### ❖ कर्जात कव्हर होणाऱ्या बाबी / कर्जासाठी विचारात घेतलेला खर्च

१. शाळा, कॉलेज, महाविद्यालय व वसतीगृह फी.

२. परिक्षा, ग्रंथालय /लायब्ररी, प्रयोगशाळा/ लॅबॉरेटरी फी,

३. परदेशातील अभ्यासासाठी प्रवास खर्च / उताऱ्याचे पैसे

४. विद्यार्थी कर्जदारांसाठी विमा प्रिमियम / विमा हप्ता (कर्जदार विद्यार्थ्याच्या आवश्यकतेनुसार)

५. विद्यार्थ्यासाठीची सुरक्षा अनामत, बिल्डींग फंड (परतावा होणारी)

६. पुस्तके / उपकरणे / वाद्ये / गणवेश खरेदीची रक्कम

७. अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी आवश्यक असल्यास माफक दरात संगणक खरेदी करणे.

८. अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी लागणारा इतर कोणताही खर्च जसे शैक्षणिक आणि देखभाल शुल्क, अभ्यास दौरे, प्रकल्प कार्य, प्रबंध, विनिमय कार्यक्रम इ.

९. विद्यार्थ्याने बाहेरील निवासाची निवड करणे आवश्यक असल्यास वाजवी निवास आणि बोर्डिंग शुल्क विचारात घेतले जाईल.

(टिप :– संपूर्ण अभ्यासक्रमासाठी एकूण शिक्षण शुल्काच्या १०% पेक्षा जास्त रक्कम नसावी या अटींनुसार या खर्चाला मान्यता देण्यात येईल. मात्र हि रक्कम मंजूर बँक कर्जाच्या एकूण कर्ज रक्कमेमधूनच देण्यात येईल.)

### ❖ शैक्षणिक कोर्सेस :

ग्रॅज्युएट, पोस्ट ग्रॅज्युएट, प्री डिग्री/ पोस्ट डिग्री/वैद्यकीय/ इंजिनिअरींग /एम.बी.ए/ हॉटेल मॅनेजमेंट, संगणक, उच्च शिक्षण, युजीसी/ सरकार / एआयसीटीई/ एआयबीएमएस/ आयसीएमआर या

मान्यताप्राप्त महाविद्यालये / विद्यापीठाद्वारे आयोजित ICWA, CA. LFA, तसेच IIMS., IITS, IISC. XLRI, NEFT, NID इत्यादी कोर्सेस (किंवा कोर्सेस ॲप्रवुड बाय आयबीए.) नियमित पदवी/पदविका असभ्यासक्रम यामध्ये एरोनॉरिकल पायलट प्रशिक्षण, शिपींग नर्सिंग मधील पदवी / डिप्लोमा किंवा सिव्हील एव्हिएशन / शिपींग / इंडियन नर्सिंग कौन्सील इत्यादी कोर्सेस MCA. MBA, MS इत्यादी.

❖ **कर्ज मागणी अर्ज** :

बँकेच्या विहित नमुन्यातील कर्ज मागणी अर्ज सादर करावा लागेल. (पासपोर्ट आकाराचा फोटोसह)

१. **कर्ज मागणी अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे** :

अ) **अर्जदार / सहअर्जदार व जामिनदार : के वाय सी :**

१) आधार कार्ड
२) पॅनकार्ड
३) लाईट बिल (मागील महिन्याचे)
४) बँक खाते उतारा / पासबुक
५) पासपोर्ट आकाराचे दोन फोटो
६) पासपोर्ट
७) विसा (Visa – परदेशातील शिक्षणासाठी कर्ज घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा )

**ब) सहअर्जदार व जामिनदार व्यावसायिक असेल तर** :

१) आयकर विवरण पत्र (३ वर्षाचे विहित मुदतीचे)
२) बँक खाते उतारा व्यवसायाच्या खात्याचा १ वर्षाचा किंवा पासबुक झेरॉक्स (१ वर्षाच्या नोंदीसह)
३) व्यावसायिकांचे स्वतःच्या बचत खात्याचे १ वर्षाच्या नोंदीसह पासबुकची झेरॉक्स, उद्योग आधार व टॅक्स रजिस्ट्रेशन,
४) आयकर अदा केल्याच्या पावत्या सादर कराव्यात.

**क) सहअर्जदार व जामिनदार नोकरदार असेल तर** :

१) आयकर विवरण पत्रासह फॉर्म नं.१६,
२) बँक खाते उतारा पगार खात्याचा (१ वर्षाचा ) किंवा पासबुक झेरॉक्स (१ वर्षाच्या नोंदीसह)
३) मागील ६ महिन्याच्या पगाराच्या स्लीप
४) अर्जदार नोकरीमध्ये कायमस्वरुपी असलेबाबत आस्थापनाचे पत्र.

२. प्रवेश निश्चितीची पत्रासोबत संबंधीत शैक्षणिक संस्थेची संपूर्ण माहिती पत्रक सादर करावे. सदर माहिती पत्रकात शैक्षणिक कोर्सचे नाव कोर्सचा कालावधी, शैक्षणिक सत्र सुरु होण्याची तारीख कोर्सची एकूण फी, फी भरण्याचे शेडयुल इ. माहिती नमूद असावी.

३. बँक कर्जासाठी कोलॅटरल सिक्युरिटी म्हणून जी मालमत्ता तारण देण्यात येणार आहे त्या मालमत्तेच्या कागदपत्रांच्या प्रत्येकी दोन छायांकित प्रती सादर करणे आवश्यक राहिल.

(४४)



४. शैक्षणिक संस्थेचे फी भरणा करणेबाबतचे मागणी पत्र.
५. शैक्षणिक कोर्स / शिक्षण पूर्ण करण्यासाठी होणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक
६. विद्यार्थ्याने इतर कोणत्याही वित्तीय संस्थेमधून शैक्षणिक कर्ज घेतलेले नाही असे पत्र सादर करावे लागेल.

❖ **कर्ज प्रकार** : मुदत कर्ज

❖ **कर्ज मर्यादा** :

१) रु.३०.०० लाख (भारतातील शिक्षणासाठी)
२) रु.४०.०० लाख (परदेशातील शिक्षणासाठी)

❖ **व्याजदर** : मा.संचालक मंडळ सभेत ठरावान्वये निश्चित करण्यात येणारा व्याजदर लागू राहिल.

❖ **परतफेड कालावधी** :

१) भारतातील शिक्षणासाठी १२ वर्षे (मोरॅटोरियम कालावधीसह)
२) परदेशातील शिक्षणासाठी १५ वर्षे (मोरॅटोरियम कालावधीसह)

१. मोरॅटोरियम कालावधी हा शिक्षणाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर जास्तीत जास्त ६ महिने इतका असेल सदर कालावधीत केवळ मासिक व्याज परतफेड करावे लागेल.
२. काही अपरिहार्य कारणास्तव (नैसर्गिक आपत्ती/ आजरपण) विद्यार्थी नियोजित वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी जास्तीत जास्त २ वर्षाची मुदतवाढ देण्यासंबंधीचे अधिकार संबंधीत विभागीय नियंत्रण समितीस राहिल / बँकेस राहील.
३. कर्ज कालावधीमध्ये दोन किंवा तीन वेळा (एका वेळी जास्तीत जास्त ६ महिने) कमी रोजगार / बरोजगारी लक्षात घेवून मोरॅटोरियम कालावधी देण्यात येईल.
४. कर्ज परतफेडीच्या कालावधीत कधीही कर्जाच्या पूर्व पेमेंटसाठी परतफेड चार्जेस( प्री-पेमेंट चार्जेस) आकारले जाणार नाहीत.

❖ **कर्ज परतफेड** :

शिक्षणाचा (कोर्सचा) कालावधी अधिक ६ महिने इतका मोरॅटोरियम कालावधी राहिल. या कालावधीत मासिक व्याज वसुल केले जाईल तद्नंतर मासिक हप्ता (व्याजासह) वसुल केला जाईल.

❖ **प्रोसेसिंग फी** :

आर.बी.आय. च्या नियमानुसार निरंक

❖ **मार्जीन**

| **कर्ज रक्कम** | **भारतातील शिक्षणासाठी** | **परदेशातील शिक्षणासाठी** |
|---|---|---|
| रु.४.०० लाखापर्यंत | निरंक | निरंक |
| रु.४.०० लाखावरील रु.७.५० लाखापर्यंत | ५% | १५% |
| रु.७.५०लाखावरील कर्जास | १०% | २०% |

❖ **कर्ज उचल :–** भारतातील व परदेशातील शिक्षणासाठी ''विद्यार्थ्यांने–अर्जदाराने सादर केलेले प्रवेश निश्चितीपत्र, शैक्षणिक संस्थेचे संपूर्ण माहितीपत्रक व फि भरण्याचे शेड्युल तपासून अर्जदाराच्या मागणीनुसार त्याचे स्पेशल बचत खात्यात कर्ज उचल रक्कम जमा करण्यात येईल.

भारतातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता त्याच्या बचत खात्यामधून पे–ऑर्डर, डी.डी. किंवा आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. द्वारे संबंधीत भारतातील शैक्षणिक संस्थेस अदा करणेत येईल.''

❖ **कर्ज उचल घेताना सादर करावयाची कागदपत्रे (उचलीची डॉक्युमेंटस)**

१. कर्ज करारनामा
२. प्रॉमिसरी नोट
३. लेटर ऑफ कंटीन्युटी/ सातत्य हमीपत्र
४. रिकव्हरी ऑफ लोन इंस्टॉलमेंट /कर्ज परतफेडीचे वैयक्तिक जबाबदारीचे हमीपत्र

❖ **अटी/ शर्ती :–**

१. अर्जदार, सहअर्जदार व जामिनदार यांना नाममात्र सभासद फी भरणा करुन बँकेचे नाममात्र सभासदत्व घ्यावे लागेल.
२. सदरचे कर्ज भारतातील व परदेशातील उच्च शिक्षणाकरीता, व्यावसायिक कोर्स पूर्ण करणेकरीता मान्यता प्राप्त संस्थांमधून शिक्षण घेण्यासाठी देण्यात येईल.
३. बँकेच्या मंजूर कर्जाची उचल स्पेशल सेव्हींग खात्यात जमा करुन अर्जदाराच्या मागणीनुसार सदर खात्यातून उचल देण्यात येईल.
४. कर्ज मागणी अर्ज सादर केलेनंतर बँक कर्ज मंजूरी व प्रत्यक्ष उचल/वाटप या कालावधीत कर्जदाराने आवश्यकतेनुसार तातडीने संबंधीत शिक्षण संस्थेस अदा केलेल्या फी ची रक्कम संबंधीत फी भरणा केलेल्या मुळ पावत्या घेवून अर्जदारास रिइम्बर्समेंट करुन देण्यात येईल (बँकेने मंजूर केलेल्या एकूण कर्ज मंजूरी रक्कमेमधून)
५. कर्जावरील व्याजदरामध्ये वेळोवेळी होणारे बदल कर्जदारावर बंधनकारक राहतील.
६. विद्यार्थ्यांनी नियमित अंतराने प्रगती अहवाल सादर करावा. तसेच अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर रोजगाराचा तपशिल सादर करावा.
७. विद्यार्थ्याने शैक्षणिक फी पोटीची रक्कम राष्ट्रीयकृत / इतर बँकेमधील बचत खात्यामधून भारताबाहेरील शैक्षणिक संस्थेस अदा केल्यानंतर सदर बचत खात्याचे पासबूक / स्टेटमेंट (शैक्षणिक फी पोटीची रक्कम नावे पडल्याची नोंद असलेले) शाखेस सादर करावे लागेल. तसेच शैक्षणिक फी पोटीच्या मुळ पावत्या बँक दप्तरी जमा कराव्या लागतील.
८. रु.७.५० लाखावरील शैक्षणिक कर्जासाठी कोलॅटरल सिक्युरिटी म्हणून घर / गाळा / दुकान तसेच सोने /एनएससी/किसान विकास पात्र/विमा पॉलिसी (अद्यावत सरेंडर व्हॅल्युसह) / मुदत ठेव इ. घेण्यात येईल. विमा पॉलिसी बँकेच्या नावे असाईन करुन द्यावी लागेल. बँक कर्जास तारण दिलेले घर / गाळा / दुकान याचे ई–फायलिंग नोंदणी सुविधे अंतर्गत विहित मुदतीत म्हणजेच कर्ज दस्तऐवज कार्यान्वीत (Execute) झालेपासून ३० दिवसांचे आत करुन घ्यावयाचे आहे.
९. अर्जदारास तारण देत असलेल्या मालमत्तेचे सर्टीफिकेट (सर्च / टायटल सर्टीफिकेट) मुल्यांकन दाखला बँकेच्या तालिकेवरील ॲडव्होकेट व व्हॅल्युअर यांचेकडून घेण्यात येईल त्यासाठी येणारा खर्च अर्जदाराने करावयाचा आहे.

(७६)



१०. मंजूर कर्जास अतिरिक्त सुरक्षितता म्हणून अर्जदाराची / सहअर्जदाराची विमा पॉलिसीज, राष्ट्रीय बचत प्रमाण पत्र, किसान विकास पत्र इत्यादी बेचेन करुन घेण्यात येईल.

११. कर्ज मंजूरी वेळी जर मॉरेटोरियम कालावधी दिला असेल तर सदर कालावधीत दरमहा १० तारखेपर्यंत व्याजाचा भरणा करावा लागेल. जर १० तारखेपर्यंत व्याज भरले नाही तर लेट पेमेंट चार्जेस रू.२५०/- दरमहा भरावे लागतील.

१२. कर्जाचा दरमहाचा हप्ता इसीएस किंवा पगार कपातीद्वारे येत असेल तरी अर्जदार/ सहअर्जदार यांचे इतर बँकेमधील खात्याचे १२ कोरे धनादेश देणे बंधनकारक राहिल.

१३. दरमहा कर्ज हप्ता (मुद्दल + व्याज) विहीत वेळेत भरला नाही तर बँकेच्या नियमानुसार लेट पेमेंट चार्जेस हप्त्याच्या रक्कमेनुसार वसुल केले जातील.

१४. विद्यार्थ्याची विमा पॉलिसी सोईस्कर अशा विमा कंपनीकडून घेणे आवश्यक आहे.

१५. कर्जाच्या अटीमध्ये पूर्व सूचनेविना बदल करण्याचा व जादा अटी अंर्तभूत करण्याचा अधिकार बँकेस राहील व तो कर्जदारास बंधनकारक राहील.